# भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate)
## (महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ प्रमाणे)

जा.क्र. क्र.तो.से.5-2015/एसआर/07/2021
दिनांक 13/05/2022

मौजे- निळगव्हाण, ता.मालेगाव, ग.नं.१३/१, भु.क्र.३४ ते ३९ व १२२ ते १२७ मधील क्षेत्र १४०४ चौ.मी. मधील "रहिवास" प्रयोजनार्थ इमारत बांधकाम नकाशांना सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक यांनी पत्र क्र. बांप./मौ.निळगव्हाण, ता.मालेगाव/ग.नं.१३/१/ससंनरना/५२८, दि.२३.०२.२०१७ अन्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे व त्याप्रमाणे बांधकाम नकाशांना उपविभागीय अधिकारी, मालेगाव उपविभाग, मालेगाव यांचेकडील पत्र क्र.०१/२०१७, दि.०७.०३.२०१७ अन्वये बांधकाम आराखडयास मंजुरी प्रदान केलेली आहे. अर्जदार यांनी मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण केलेनंतर इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

अर्जदार यांनी इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्याबद्दलचा दि.१४.०३.२०२२ रोजीचा प्रस्ताव. उपविभागीय अधिकारी, मालेगाव उपविभाग, मालेगाव कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावासोबत वास्तुविशारद श्री. सिध्दार्थ मेहता यांचे सदर बांधकामाचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्याप्रमाणे सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक या कार्यालयातील सहायक नगर रचनाकार, यांचेकडून दि. २०/०४/२०२२ रोजी बांधकामाची तपासणी केलेली आहे. सदर तपासणी वेळी या कार्यालयाने मंजुरीस्तव शिफारस केलेल्या बांधकाम नकाशानुसार बांधकाम केल्याचे दिसून येते.

### <u>बांधकामाचा तपशिल</u>

भोगवटा प्रमाणपत्र अपेक्षिलेल्या रहिवास इमारतीचे बांधकाम ग.नं.१३/१, भु.क्र.३४ ते ३९ व १२२ ते १२७ मधील क्षेत्र १४०४ चौ.मी. बांधकाम हे या कार्यालयाने मंजूरीस्तव शिफारस केलेल्या बांधकाम नकाशानुसार आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे इमारतीचे केलेले बांधकाम हे या कार्यालयाने मंजुरीस्तव शिफारस केलेल्या बांधकाम नकाशानुसार बांधकाम केल्याचे दिसून येते.

वरील बांधकाम तपशीलामध्ये नमुद केलेनुसार इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) खालील अंटीस अधिन राहुन निर्गमित करणेची शिफारस करणेत येत आहे.

१. स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासुन, पुढील, मागील व बाजुची समासिक अंतरामधील जागा कायम खुली ठेवावी.
२. नियोजन बांधकामामध्ये मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे झाल्यास किंवा वापर बदलावयाचा झाल्यास या कार्यालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
३. नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणत्याही वहीवाटीने हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालक यांची राहील.
४. **विषयांकित जागेत Rain Water Harvesting व Solar Water System कार्यान्वीत करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.**

सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक यांनी पत्र जा. क्र. बांप/मौ.निळगव्हाण, ता.मालेगाव/ग.नं.१३/१/ससंनरना/५२८, दि.२३.०२.२०१७ अन्वये मंजुरीची शिफारस केलेल्या पत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

सबब उपरोक्त तपशिलामध्ये नमूद रहिवास वापराचे इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

( मंजुषा घटे )
**सहायक संचालक, नगर रचना,**
**नाशिक शाखा, नाशिक**

उपविभागीय अधिकारी मालेगाव

( )
**उपविभागीय अधिकारी,**
**मालेगाव उपविभाग मालेगाव**

प्रत :-

१. सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक
२. श्री. सिध्दार्थ संजयकुमार मेहता, रा. मालेगाव कॅम्प, ता. मालेगाव, जि. नाशिक
३. ग्रामसेवक, ग्रामपंचायत निळगव्हाण ता. मालेगाव जि. नाशिक यांना माहितीसाठी व कर आकारणीकरीता अग्रेषित.